जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १९५ | बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## तिन्ही जागांवर मोठ्या मताधिक्याचा विजय निश्चित : विकास जगताप

### उरुळी कांचनमध्ये भाजपची निर्णायक आघाडी

**उरुळी कांचन, ता. ३ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आता अंतिम टप्प्यात येऊन ठेपली असून उरुळी कांचन जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात भारतीय जनता पक्षाने स्पष्ट आणि निर्णायक आघाडी घेतल्याचे चित्र आहे. गावोगावी, वाड्या-वस्त्यांवर उमटणारा जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता भाजपचे तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्क्याने विजयी होणार, असा ठाम व ठोस विश्वास भाजपचे पुणे जिल्हा कोषाध्यक्ष विकास जगताप यांनी व्यक्त केला आहे.

प्रचाराच्या आढाव्यानंतर बोलताना जगताप म्हणाले, या निवडणुकीत भाजपने केवळ घोषणा न करता नियोजनबद्ध, शिस्तबद्ध आणि विकासकेंद्री प्रचारावर भर दिला. मतदारराजाच्या थेट भेटी घेत त्यांच्या समस्या समजून घेतल्या आणि केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून झालेल्या विकासकामांचा वस्तुनिष्ठ लेखाजोखा जनतेसमोर मांडला. त्यामुळे मतदारांचा कौल स्पष्टपणे भाजपच्या बाजूने झुकलेला दिसतो आहे.

उरुळी कांचन जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणात भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत रंगली आहे. जिल्हा परिषद गटात भाजपकडून

**प्रचाराच्या रणधुमाळीत राष्ट्रवादी पिछाडीवर?**

उरुळी कांचन परिसरात राजकीय चित्र झपाट्याने बदलताना दिसत आहे. आक्रमक, नियोजनबद्ध आणि विकासकेंद्री प्रचाराच्या जोरावर भारतीय जनता पक्षाने प्रचारात ठळक मुसंडी मारली असून राष्ट्रवादी काँग्रेस मात्र या रणधुमाळीत पिछाडीवर असल्याचे दिसून येत आहे. प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात भाजपने वेग घेतला असून राष्ट्रवादीला ही पिछाडी भरून काढणे कठीण जाणार आहे. अशी चर्चा नागरिकांमध्ये जोरदार रंगली आहे.



शंकर बडेकर तर राष्ट्रवादीकडून जितेंद्र बडेकर रिंगणात आहेत. सोरतापवाडी पंचायत समिती गणात भाजपचे सुदर्शन चौधरी आणि राष्ट्रवादीचे अण्णा महाडिक आमनेसामने आहेत. उरुळी कांचन पंचायत समिती गणात भाजपच्या सारिका लोणारी यांच्याविरोधात राष्ट्रवादीच्या कोमल कांबळे मैदानात उतरल्या आहेत. भाजपने निवडणुकीच्या सुरुवातीपासूनच रणशिंग फुंकत प्रचारात कोणतीही कसर सोडलेली नाही. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या लोककल्याणकारी योजना, राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली झालेली विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर भाजपने ठोस आणि विश्वासार्ह भूमिका मांडली आहे.

भाजपचे तिन्ही उमेदवार हे केवळ निवडणुकीपुरते चेहरे नसून नेतृत्व सिद्ध केलेले, कामातून विश्वास निर्माण करणारे आणि विकासाचा स्पष्ट अजेंडा असलेले लढवय्ये आहेत. जनतेमध्ये सातत्याने वावरून प्रश्न सोडवण्याची ताकद आणि निर्णय घेण्याची क्षमता भाजपच्या उमेदवारांकडे आहे. त्यामुळे या लढतीत भाजपचे तिन्ही उमेदवार स्पष्ट आघाडीवर असून विजय ही केवळ औपचारिकता ठरणार आहे, असे जगताप यांनी आवर्जून नमूद केले. दरम्यान, गावोगावी, चौकाचौकात आणि प्रचार सभांमध्ये भाजपच्या उमेदवारांना मिळणारा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता वातावरण पूर्णतः भाजपच्या बाजूने फिरल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## थेऊर गटावर राष्ट्रवादीचाच झेंडा : माजी सरपंच सचिन तुपे

### तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होणार

**लोणी काळभोर, ता. ३ :** थेऊर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील निवडणूक आता अंतिम टप्प्यात पोहोचली असताना राष्ट्रवादी काँग्रेसने निर्णायक आघाडी घेतली असून, या गटातून राष्ट्रवादीचे तीनही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येणारच आहेत. असा ठाम विश्वास कुंजीरवाडीचे माजी सरपंच सचिन तुपे यांनी व्यक्त केला आहे.

सचिन तुपे म्हणाले की, थेऊर गट हा गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे. या भागात पाणी, रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगार यासारख्या मूलभूत प्रश्नांवर फक्त राष्ट्रवादीनेच सातत्याने काम केले आहे. केवळ निवडणुकीपुरते दिसणारे विरोधक आता जनतेच्या रोषाला सामोरे जात असून, मतदार त्यांना धडा शिकवण्याच्या तयारीत आहेत.

विरोधकांकडे सांगण्यासारखे एकही ठोस काम नाही. फक्त अफवा, आरोप आणि खोट्या आश्वासनांवर त्यांचा प्रचार सुरू आहे. पण थेऊरच्या जनतेने हे खेळ ओळखले आहेत. त्यामुळे यावेळी मतपेटीतूनच त्यांचा निकाल लागणार आहे, असा घणाघातही तुपेंनी केला.



थेऊर जिल्हा परिषद गटातून कोमल आव्हाळे, थेऊर पंचायत समिती गणातून आरोग्यदूत युवराज काकडे, तर आव्हाळवाडी पंचायत समिती गणातून सुषमा मुरकुटे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. या तिन्ही उमेदवारांना सर्वसामान्य नागरिकांचा उत्स्फुर्त पाठिंबा मिळत असून प्रचाराला चांगला प्रतिसाद लाभत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार हे अनुभवी, स्वच्छ प्रतिमेचे आणि सर्वसामान्यांशी थेट संपर्क असलेले आहेत. घराघरांतून त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून, महिला, युवक, शेतकरी, कामगार सर्व घटक ठामपणे राष्ट्रवादीच्या पाठीशी उभे आहेत. ही लाट नसून, ही विकासावर दिलेली शिक्कामोर्तब आहे, असे तुपे म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यात आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली. त्या विकासाचीच पावती थेऊर गटातील जनता देणार आहे. ज्यांनी संकटाच्या काळात साथ दिली, ज्यांनी निधी आणला, कामे करून दाखवली, त्यांनाच जनता पुन्हा संधी देणार, असा विश्वास तुपेंनी व्यक्त केला.

दरम्यान, निवडणुकीच्या रणधुमाळीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. हा समस्त जनतेसाठी मोठा आघात असून, अजित दादांना आदरांजली म्हणून मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मतदान करून त्यांना विजयी करावे, असे भावनिक आवाहन सचिन तुपे यांनी केले.

**थेऊर गटात राष्ट्रवादीचाच झेंडा फडकणार?**

सध्या प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते गावोगावी, वाड्या–वस्त्यांवर जोमाने काम करत असून वातावरण पूर्णपणे राष्ट्रवादीच्या बाजूने झुकले आहे. विरोधकांचा प्रचार थंडावला असून त्यांच्या गोटात प्रचंड अस्वस्थता दिसून येत आहे. निवडणुकीनंतर थेऊर गटातून तीनही जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा फडकणार, यात शंका नाही. ही निवडणूक विरोधकांच्या राजकीय अस्ताला कारणीभूत ठरेल, असा आक्रमक दावा करत सचिन तुपे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

## कोरेगाव मूळ गणातील ग्रामीण व नागरी या दोन्ही समस्या सोडवणार

### विकासाचा ठोस अजेंडा मांडत कृषिराज चौधरी यांनी वेधले मतदारांचे लक्ष

**उरुळी कांचन, ता. ३ :** कोरेगाव मूळ गण हा शहरी व ग्रामीण अशा दोन विभागात विभागला गेला आहे त्याम ुळे महामार्गाच्या बाजूला नागरीकरण वाढले असले तरी, ग्रामीण भागातील शेतकरी, वीज, शेतीसाठी लागणारी अवजारे आणि पाणी व्यवस्थेसारखी मूलभूत समस्या यापुढील काळात नक्कीच सोडवणार असल्याचे प्रतिपादन कोरेगाव मूळ गणातील पंचायत समिती राष्ट्रवादीचे उमेदवार कृषीराज उर्फ मनोज चौधरी यांनी केले आहे.

कोरेगाव मूळ पंचायत समितीची निवडणूक आता निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. पंचायत समितीचे राष्ट्रवादीचे उमेदवार कृषीराज चौधरी यांनी ग्रामीण व नागरी भागातील विकासाचा ठोस अजेंडा मांडत म



तदारांचे लक्ष वेधले आहे.

ग्रामीण भागातील मूलभूत सम स्या सोडवण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच उमेदवार सातत्याने पुढाकार घेत आहेत. आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, वीजपुरवठा, शेती, महिला सक्षमीकरण आणि समाजकल्याण या मुद्द्यांवर त्यांनी ठोस धोरणे मांडली आहेत. त्यामुळे मतदार या स्पष्ट आणि परिणामकारक भूमिकेने प्रभावित झाले आहेत. ही निवडणूक फक्त राजकीय मत देण्याची नाही, तर महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्याची संधी आहे.

शेती व शेतकरी प्रश्नांवर कृषीराज चौधरी यांनी पाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा, रस्ते आणि बाजारपेठेशी जोडणी या बाबींवर ठोस काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. नागरी सुविधांमध्ये स्वच्छ पाणीपुरवठा, दर्जेदार रस्ते, स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन या समस्यांवरही प्राधान्य दिले जाणार आहे. दादांचे निधन राज्यासाठी मोठा धक्का आहे, पण दादांनी शिकवल्याप्रमाणे आम्ही रडत बसणार नाही. प्रत्येक कार्यकर्त्याला लढण्याचे बळ अजित दादांनी दिले आहे. या निवडणुकीत आम्ही दादांच्या कार्याची खरी श्रद्धांजली देणार आहोत.

दरम्यान, कृषिराज चौधरी म्हणाले, राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच हवेली तालुक्याच्या विकासाचे शिल्पकार स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे फक्त राजकीय नेते नव्हते; ते जनतेसाठी कामाचे दादा होते. त्यामुळे अजितदादांच्या मार्गदर्शनाखालील आम्हीही ठोस धोरणे आणि विकासाच्या प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून मतदारांचा विश्वास मिळवण्याचे काम जोरदारपणे सुरू ठेवले आहे.

## लोणी काळभोर गटातील भाजपच्या तिन्ही उमेदवारांच्या विजयाचा मार्ग मोकळा : माजी सरपंच भरत काळभोर

**लोणी काळभोर, ता. ३ :** लोणी काळभोरच्या इतिहासात प्रथमच वनविभागाच्या हद्दीत सिमेंट काँक्रीटचे दर्जेदार रस्ते निर्माण करून नागरिकांना दिलासा देण्याचे ऐतिहासिक काम करण्यात आले आहे. कोंडे वस्ती व केसकर वस्तीला जाणारे रस्ते लवकरच पूर्ण करण्यात येणार असून, ग्राम स्थांच्या दैनंदिन अडचणी कायमच्या दूर करण्याचा आमचा संकल्प आहे. जनता विकासाच्या पाठीमागे असल्याने भाजपच्या तिन्ही उमेदवारांच्या विजयाचा मार्ग मोकळा झाला आहे. असा विश्वास माजी सरपंच भरत काळभोर यांनी व्यक्त केला आहे.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातील भाजप उमेदवारांच्या प्रचारसभेत माजी सरपंच भरत काळभोर बोलत होते. यावेळी हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, माजी सरपंच माधुरी काळभोर, किरण शिवदास काळभोर, माजी उपसरपंच ज्योती अमित काळभोर, कमलेश काळभोर व भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुढे बोलताना काळभोर म्हणाले की, रामदरा हे संपूर्ण जिल्ह्याचे श्रद्धास्थान असून दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. मात्र पुलाच्या अभावामुळे भाविकांना व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही अडचण ओळखून रामदरा पुलाचे काम पूर्ण करून आम्ही विकासाची केवळ घोषणा नाही तर कृती करून दाखवली आहे, असेही काळभोर यांनी ठामपणे सांगितले.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गटातून पूनम बाबुराव गायकवाड, लोणी काळभोरवडकी पंचायत समिती गणातून श्वेता कम लेश काळभोर, तर कदम वाकवस्ती पंचायत समिती गणातून ज्ञानेश्वर नामुगाडे हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. केवळ आश्वासनांची राजकारण न करता आम्ही प्रत्यक्ष विकास करून दाखवला आहे. आम्ही विकास केला आहे आणि अजून मोठ्या प्रमाणात विकास करायचा आहे.

लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाच शेतकऱ्यांना उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आल्याचा उल्लेख करत काळभोर म्हणाले की, भाजप शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. आम्ही जनतेसमोर केवळ शब्दांनी नाही तर विकासाच्या कामांच्या जोरावर जात आहोत.

दरम्यान, रस्ते, पाणी, वीज, शेतीपूरक सुविधा, धार्मिक व पर्यटन विकास या सर्व बाबींमध्ये लोणी काळभोरला आदर्श गाव बनवण्याचा आमचा निर्धार आहे. त्यामुळे सर्वांगीण विकासासाठी जनतेने भाजपच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन भरत काळभोर यांनी केले आहे. प्रचारादरम्यान गावोगावी, वाड्या-वस्त्यांवर भाजप उमेदवारांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून, नागरिकांचा वाढता विश्वास स्पष्टपणे दिसून येत आहे. विरोधकांकडे सांगण्यासारखे काहीही उरलेले नाही, तर भाजपकडे दाखवण्यासारखा विकास आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत भाजपच्या तिन्ही उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा ठाम विश्वास माजी सरपंच भरत काळभोर यांनी व्यक्त केला.

## अजितदादांचे सर्व विधी तीन दिवसांतच आटोपले; सार्वजनिक दशक्रिया विधी होणार नाही

**पुणे, ता. ३ :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला बारामती येथे झालेल्या विमान अपघातात निधन झाल्यानंतर अंत्यसंस्कारानंतरचे धार्मिक विधी कसे पार पडणार, याबाबत उत्सुकता होती. मात्र आता स्पष्ट झाले आहे की, अजित पवार यांचे दशक्रिया व त्यानंतरचे विधी सार्वजनिक स्वरूपात न होता कुटुंबीयांच्या उपस्थितीत घरगुती पद्धतीनेच पूर्ण करण्यात येणार आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर दुसऱ्याच दिवशी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले होते. त्यानंतर ३० जानेवारीला अस्थी सावडण्याचा कार्यक्रम झाला आणि त्याच दिवशी सोनगाव येथील कऱ्हानीरा संगमावर अस्थींचे विसर्जन करण्यात आले. कुटुंबीयांनी याच वेळी आवश्यक ते सर्व धार्मिक विधी पूर्ण केल्याने दहावा किंवा तेरावा दिवस यानिमित्ताने कोणताही सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केला जाणार नसल्याची माहिती समोर आली आहे. पुरोगामी भूमिका जपत तीन दिवसांतच विधी उरकण्यात आल्याचे समजते.

या निर्णयावर पवार कुटुंबाकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नसली, तरी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, तसेच पार्थ पवार किंवा जय पवार यांनी याबाबत कोणतीही सार्वजनिक माहिती दिलेली नाही. दरम्यान, बारामतीतील काटेवाडी येथील निवासस्थानी आज सांत्वनपर भेटींचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

सुनेत्रा पवार या मंगळवारी काटेवाडी येथे उपस्थित असून, दुपारी ४ वाजेपर्यंत पवार कुटुंबीय सांत्वनासाठी येणाऱ्यांची भेट घेत आहेत. त्यामुळे सकाळपासूनच नेते, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे.

दरम्यान, राजकीय पातळीवरही हालचाली वेग घेत आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, पार्थ पवार यांचा राज्यसभेत प्रवेश होण्याची शक्यता वाढली आहे. सुनेत्रा पवार यांची राज्यसभेची उर्वरित मुदत ४ जुलै २०२८ पर्यंत असली, तरी त्या जागेऐवजी सहा वर्षांची पूर्ण टर्म असलेल्या जागेवर पार्थ पवार यांना पाठवण्याची तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. लवकरच ही जागा भरण्यात येणार असून, त्यासाठी पार्थ पवारांनी मोर्चेबांधणी सुरू केल्याचेही सांगितले जात आहे.

एकीकडे कुटुंबीयांनी साधेपणा आणि पुरोगामी विचार जपत धार्मिक विधी मर्यादित ठेवले, तर दुसरीकडे अजित पवार यांच्या निधनानंतरची राजकीय पुनर्रचना हळूहळू आकार घेत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## लोणी काळभोर–कदमवाकवस्तीतील तिन्ही उमेदवारांना विजयी करणे हीच दादांना खरी आदरांजली

### आमदार माऊली कटके; कदमवाकवस्ती येथे मतदारांशी साधला संवाद

**लोणी काळभोर, ता. ३ :** राज्याचे स्व. उपमुख्यमंत्री अजित दादांनी लोणी काळभोरकदम वाकवस्ती गटात दिलेले तिन्ही उमेदवार सक्षम आणि जनतेच्या विश्वासास पात्र आहेत. यापूर्वीही जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मायबाप जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर विश्वास दाखवलेला आहे. तोच विश्वास पुढे नेत, तिन्ही उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करणे हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल. असे प्रतिपादन शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी केले.

कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील घोरपडे वस्ती परिसरात मतदारांशी संवाद साधताना आमदार कटकेबोलत होते. पाच-सहा दिवसांपूर्वी घडलेल्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. सर्वसामान्य जनतेपासून कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते आणि तीन ते चार दिवस संपूर्ण राज्य स्तब्ध झाले होते, अशी भावना व्यक्त करत दिवंगत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, कदमवाकवस्तीचे माजी सरपंच नंदू काळभोर, जिल्हा परिषदेच्या उमेदवार शीतल कांबळे, पंचायत




समितीचे उमेदवार अमोल टेकाळे, राष्ट्रवादीचे नेते युवराज काळभोर, उद्योजक मयूर काळभोर, मुकुल काळभोर, प्रतिक काळभोर, गौरव काळभोर, आदी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे बोलताना आमदार कटके म्हणाले, दादांचे जाणे हा केवळ एका व्यक्तीचा मृत्यू नसून महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व विकासात्मक विचारधारेचे मोठे नुकसान आहे. गेल्या ३५ ते ४० वर्षांच्या राजकीय जीवनात दादांनी असंख्य कार्यकर्ते घडवले. माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यालाही विधानसभेत काम करण्याची संधी दिली, हे मी कधीही विसरू शकत नाही.

दरम्यान, दादांना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील प्रत्येक गावाची माहिती होती. असे एकही गाव नव्हते जिथे ते गेले नव्हते. पहाटे पाच वाजता उठून रात्रंदिवस काम करणारा, सर्वसामान्य माणसाला सहज भेटणारा नेता हरपल्याने राज्यावर मोठा आघात झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पवार कुटुंब आणि दादांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक विकास, रस्ते, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण भागाला गती देण्याचे काम संपूर्ण महाराष्ट्रात झाले. त्यांच्या जाण्याने ही पोकळी कधीही भरून न निघणारी आहे.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त

### पुण्यात कॅब चालकाकडून महिलेशी अश्लील वर्तन

**पुणे, ता. ३ :** पुण्यातील बाणेर परिसरात ॲपवरून कॅब बुक केल्यानंतर एका महिलेचा धक्कादायक अनुभव समोर आला आहे. ओटीपी दिल्यानंतर कॅबचालकाने अचानक दुप्पट भाड्याची मागणी केली आणि त्याला विरोध केल्यावर भर दिवसा महिलेचा विनयभंग केल्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे शहरातील महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. फिर्यादी महिला ४२ वर्षांच्या असून, १ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे ८:४५ वाजता त्यांनी घरी जाण्यासाठी Uber ॲपवरून कॅब बुक केली होती. कॅब आल्यानंतर त्या वाहनात बसल्या आणि चालकाला ओटीपी सांगितला. त्यानंतर चालकाने प्रवासाचे भाडे ७०० रुपये असल्याचे सांगितले. ॲपमध्ये मात्र भाडे ३५० रुपये दाखवत असल्याने महिलेने जादा रक्कम का मागितली जात आहे, अशी विचारणा केली. यावर चालकाने वाद घालण्यास सुरुवात केली. परिस्थिती बिघडत असल्याचे लक्षात येताच महिला कॅबमधून उतरून पायी निघाल्या. मात्र कॅबचालक त्यांचा पाठलाग करत रस्त्यातच त्यांच्या दिशेने अश्लील हावभाव आणि वर्तन करू लागला. भर रस्त्यावर घडलेल्या या प्रकारामुळे महिला प्रचंड घाबरल्या. काही वेळानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. या घटनेनंतर महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी संबंधित उबेर कॅब चालकाविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

### पुण्यात 'ज्युनिअर असिस्टंट' पदासाठी बसलेला बोगस उमेदवार अटकेत

**पुणे, ता. ३ :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेत गैरप्रकार करण्याचा प्रकार पुण्यात उघडकीस आला असून, डमी परीक्षार्थी म्हणून बसलेल्या तरुणाला रंगेहात पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. सीबीएसईकडून कनिष्ठ लेखापाल आणि सहायक पदांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेत मूळ उमेदवाराऐवजी दुसराच व्यक्ती परीक्षा देत असल्याचे समोर आले असून, या प्रकरणामुळे स्पर्धा परीक्षांतील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ही घटना १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेनऊ वाजता औंध येथील डीएव्ही पब्लिक स्कूलमधील परीक्षा केंद्रावर घडली. परीक्षेसाठी आलेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासली जात असताना पर्यवेक्षिका राधिका कार्तिक यांच्या संशयावरून हा प्रकार उघड झाला. ओळखपत्र आणि प्रत्यक्ष व्यक्तीमध्ये विसंगती आढळल्यानंतर त्यांनी चौकशी केली असता, संबंधित तरुण हा मूळ उमेदवार नसल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणात अमित कमलसिंग शर्मा (वय २५, रा. न्यांगल छोटी, ता. सिंधमुख, जि. चुरु, राजस्थान) याला डमी परीक्षार्थी म्हणून अटक करण्यात आली आहे. तर मूळ परीक्षार्थी धमेंदर संजीव कुमार (वय २२, रा. नौताना, महेंद्रगड, हरियाना) याच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे पुणे–बीडचे पालकमंत्रीपद

## अजितदादांची जवळपास सर्व खाती सोपवली, शासनाचा अधिकृत निर्णय

**पुणे, ता. ३ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राज्याच्या राजकारणात झपाट्याने घडामोडी घडत आहेत. त्यांच्या निधनानंतर अवघ्या चौथ्या दिवशी पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आता त्यांच्याकडे पुणे आणि बीड या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीपदही सोपवण्यात आले आहे. यासह अजित पवारांकडे असलेली जवळपास सर्वच प्रशासकीय खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आली असून, केवळ अर्थ खाते वगळण्यात आले आहे. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने अधिकृत परिपत्रक जारी केले आहे.

शोकसागरात बुडालेल्या राज्यात हा निर्णय वेगाने घेण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. शपथविधी घाईघाईत झाल्याची टीका होत असताना, दुसरीकडे प्रशासनात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी हा निर्णय आवश्यक असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल माने यांनी सांगितले की, पवार कुटुंबाने तिसऱ्याच दिवशी दशक्रिया विधी पूर्ण केल्याने चौथ्या दिवशी शपथविधी पार पडला. राज्याच्या कारभारात खंड पडू नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला,



असे त्यांनी स्पष्ट केले. सुनेत्रा पवार ९ फेब्रुवारीपासून मंत्रालयात नियमितपणे कार्यभार सांभाळणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या खांद्यावर आता पुण्यासारख्या आर्थिक-शैक्षणिक केंद्राची जबाबदारी असून, बीडसारख्या संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या जिल्ह्याचाही कारभार त्यांना पाहावा लागणार आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती आणि बीड जिल्ह्यात बंद पाळण्यात आला होता. बारामतीत जनतेने आपल्या लाडक्या नेत्याला अश्रूंनी निरोप दिला, तर बीडमध्येही पालकमंत्री म्हणून अजित पवारांनी निर्माण केलेल्या विश्वासामुळे तीव्र भावनिक प्रतिक्रिया उमटल्या. विशेष म्हणजे संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर अजित पवारांकडे बीडचे पालकमंत्रीपद देण्यात आले होते. आता हीच जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे आल्याने, बीड आणि पुणे जिल्ह्यातील राजकीय स्थैर्य, प्रशासकीय समन्वय आणि विकासकामांची दिशा कशी राहते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून त्यांनी स्वीकारलेली ही जबाबदारी पुढील काळात त्यांच्या नेतृत्वाची कसोटी ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

### विवाह मोडणाऱ्या प्रियकराला अटक

**पुणे, ता. ३ :** प्रेमसंबंध तोडल्याने तरुणीला व तिच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याची धमकी देऊन नियोजित पतीला छायाचित्रे पाठवून विवाह मोडण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी येरवड्यातील लक्ष्मीनगर पोलिसांनी एका तरुणाला अटक केली.

इम्रान रहमान शेख (वय-२२, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत एका २१ वर्षाच्या तरुणीने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणीचे आरोपी इम्रान शेख याच्याशी चार वर्ष प्रेमसंबध होते. तरुणीच्या कुटुंबीयांनी तिचा विवाह ठरविला. त्यामुले तरुणीने त्याला प्रेमसंबंध ठेवू नको, माझा विवाह ठरला आहे, असे शेख याला सांगितले. त्यानंतर शेखने तरुणीला शिवीगाळ करुन धमकावले. तुझा विवाह जमू देणार नाही. तुझ्या कुटुंबीयाचा खून करेल, अशी धमकी दिली.

# घरोघरी जाऊन प्रचार करा, छोट्या बैठका व मेळाव्यांवर भर द्या : रविंद्र चव्हाण

**पुणे, ता. २ :** घरोघरी जाऊन प्रचार करा, छोट्या बैठका व मेळाव्यांवर भर द्या आणि स्थानिक पातळीवरच प्रचार यंत्रणा अधिक प्रभावी करा, असे आदेश भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पुण्यात प्रमुख पदाधिकाऱ्यांची आढावा बैठकीत दिले आहेत.

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोम वारी (ता. २) पुण्यात बैठक घेतली. यावेळी त्यांनी पक्ष संघटनेला स्पष्ट आणि ठोस निर्देश दिले आहेत. या बैठकीस प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, आमदार राहुल कुल, भीमराव तापकीर, पुणे दक्षिण जिल्हाध्यक्ष शेखर वढणे, पुणे उत्तर जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, माजी आमदार संजय जगताप व संग्राम थोपटे यांची प्रमुख




उपस्थिती होती.

यापुढे बोलताना चव्हाण म्हणाले, प्रदेश स्तरावरील कोणताही मंत्री किंवा वरिष्ठ पदाधिकारी प्रचारासाठी येणार नसल्याचे स्पष्ट करत, स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीच प्रचाराची संपूर्ण जबाबदारी सांभाळावी, असे चव्हाण यांनी ठणकावून सांगितले. बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांची भूमिका निर्णायक ठरणार असून, संघटनात्म क ताकदीच्या जोरावर निवडणूक लढवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली केंद्र व राज्य सरकारने राबवलेल्या विकासकामांची माहिती तसेच विविध शासकीय योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्याचे आवाहन चव्हाण यांनी केले. विकास हा भाजपचा मुख्य मुद्दा असून, त्याच आधारे मतदारांपर्यंत पोहोचण्याचे निर्देश त्यांनी दिले.

दरम्यान, यावेळी माजी मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी बूथ यंत्रणा अधिक सक्षमपणे वापरण्याचा सल्ला देत, संघटन, कार्यकर्त्यांची मेहनत आणि विकासाभिमुख प्रचार यामुळे भाजपला घवघवीत यश मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. बैठकीचे सूत्रसंचालन राजेश पांडे यांनी केले. तर बैठकीच्या सुरुवातीस दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### अर्थसंकल्पात शेतकऱ्यांची पुन्हा बोळवण

**पुणे, ता. ३ :** केंद्र सरकारच्या आर्थिक वर्ष २०२६२७ च्या अर्थसंकल्पात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेसाठी कोणतीही वाढ न केल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या योजनेसाठी ६३ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद कायम ठेवत मागील वर्षाचीच पुनरावृत्ती केली आहे. त्यामुळे यंदाही शेतकऱ्यांना दरवर्षी फक्त ६ हजार रुपये इतकीच आर्थिक मदत मिळणार असून, वाढत्या उत्पादन खर्चाच्या पार्श्वभूम ीवर ही रक्कम अत्यंत अपुरी असल्याची टीका शेतकरी संघटनांकडून होत आहे.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना २०१९ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत पात्र जम ीनधारक शेतकरी कुटुंबांना थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने दरवर्षी ६ हजार रुपये दिले जातात. ही रक्कम प्रत्येकी दोन हजार रुपयांचे तीन हप्ते करून थेट बँक खात्यात जमा केली जाते. लागवडीपूर्वीच्या प्राथमिक खर्चासाठी शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा या योजनेचा उद्देश असल्याचे केंद्र सरकारकडून सांगितले जाते. योजनेचा २१ वा हप्ता १९ नोव्हेंबर रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला असून, २२ वा हप्ता फेब्रुवारीच्या अखेरीस मिळण्याची शक्यता आहे. मात्र, मदतीत कोणतीही वाढ न झाल्याने या हप्त्याबाबत शेतकऱ्यांम ध्ये उत्साहाऐवजी नाराजीचे वातावरण आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, म जुरी, वीज आणि इंधनाचे दर सातत्याने वाढत असताना, ६ हजार रुपयांची वार्षिक मदत शेतकऱ्यांच्या खर्चापुढे अत्यंत तुटपुंजी ठरत असल्याचे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे.




# उरुळी कांचन येथून अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले

## शिंदवणे येथील तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

उरुळी कांचन, ता. ०३ : उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका गावातील अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेल्याप्रकरणी शिंदवणे (ता. हवेली) येथील एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मुलीच्या आईने उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तुषार शितोळे या तरुणाविरुद्ध BNS कलम १३७ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदरची मुलगी हि उरुळी कांचन येथील एका नाम ांकित विद्यालयात १२ वीच्या वर्गात शिक्षण घेत होती. गुरुवारी २९ जानेवारीला प्रॅक्टिकल परीक्षेसाठी ती सकाळी कॉलेजला गेली होती. मात्र उशिरा पोहोचल्याने तिला वर्गाबाहेर उभे करण्यात आले आणि त्यानंतर ती कॉलेजमधून निघून गेली. मुलीचा भाऊ याला त्याची बहिण हि तुषार शितोळे या युवकासोबत नंबर प्लेट नसलेल्या काळ्या रंगाच्या ॲक्टिव्हा दुचाकीवरून जाताना दिसली. त्याने तिला थांबण्याचा इशारा देऊनही दोघेही दुचाकीवरून वेगाने निघून गेले. यानंतर कुटुंबीयांनी उरुळी कांचन परिसर, तुषार शितोळे याचे राहते ठिकाण तसेच नातेवाईक व मैत्रिणींकडे शोध घेतला. मात्र मुलगी सापडली नाही.

दरम्यान, मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपी तुषार शितोळे याने कोणत्यातरी अज्ञात कारणवरून फुस लावुन पळवून नेले असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. कोणालाही सदर मुलीबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ उरुळी कांचन पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल खोमणे करीत आहेत.

# दादांचे महामार्गावरुन बारामतीला जाण्याचे होते नियोजन

## वाहनचालक शामराव मणवे

**मुंबई, ता. ३ :** महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वपूर्ण झंझावात शांत झाला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या आठवणी आणि त्या रात्री घडलेले प्रसंग पुन्हा चर्चेत आहेत. दादांचे विश्वासू वाहनचालक शामराव मणवे यांनी अपघाताच्या आदल्या रात्री घडलेल्या घटनांचा धक्कादायक खुलासा केला आहे.

मंगळवारी, कॅबिनेट बैठकीनंतर दादा रस्ते मार्गाने पुण्याला आणि तिथून बारामतीला जाण्याचा नियोजन करत होते. सकाळी १० वाजता बाराम तीत त्यांच्या सभांचे आयोजन केले होते. गाडीत बॅगाही आधीच भरल्या होत्या, प्लॅन ९९% पक्का होता, असे मणवे सांगतात.

तरीसुद्धा, मंत्रालयातील बैठकीला उशीर झाल्यामुळे शेवटच्या क्षणी



दादांनी निर्णय बदलला आणि थेट विम ानाने बारामतीला जाणे ठरवले. मणवे यांनी सांगितले, तू गाडी घेऊन पुण्याला जा, मी बारामती आटोपून तिथे येतो.

शामराव मणवे यांना आठवणीत सांगितले, दादांचे वेळेचे नियोजन इतके अचूक होते की, ६ ची वेळ दिली तर आम्ही साडेपाच वाजता तयार असायचो. लोकांना ते रागीट वाटायचे, पण ते फक्त शिस्तीचे कट्टर होते. विनाकारण ते कोणावरही ओरडत नसत. या खुलाश्यानंतर, दादांच्या नेतृत्वाखाली असलेली शिस्त, नियोजन आणि अचूक वेळापत्रक याचा प्रकाश पुन्हा दिसून येतो, आणि त्यांच्या अचानक निर्णयबदलाने अखेरची घटना कशी घडली, याची राजकीय व संस्म रणीय चर्चा सुरू झाली आहे.

# शेतकऱ्यांचं कर्ज माफ होणार अन् महिलांना ५ लाखांचं बिनव्याजी कर्ज

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**धाराशिव, ता. ३ :** राज्यातील शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबवण्यासाठी महायुती सरकारने कंबर कसली असून, लवकरच 'गरजू आणि गरीब' शेतकऱ्यांसाठी मोठ्या कर्जमाफीचा निर्णय घेतला जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेयांनी धाराशिव जिल्ह्यातील येणेगुर येथे बोलताना सरकारचा हा इरादा स्पष्ट केला. कर्जमाफी सरसकट होणार नाही. ही केवळ खऱ्या अर्थाने संकटात सापडलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठीच असणार आहे.

बावनकुळे यांनी आपल्या भाषणात 'धनदांडगे' विरुद्ध 'खरे शेतकरी' असा स्पष्ट फरक केला. अनेकदा कर्जमाफीचा फायदा आर्थिकदृष्ट्या सक्षम लोक घेतात,



असे चित्र पाहायला मिळते. मात्र, यंदा सरकार व्याजाच्या चक्रात अडकलेल्या गरीब कुटुंबांनाच केंद्रस्थानी ठेवणार आहे.

शेतकरी वारंवार कर्जाच्या गर्तेत का अडकतो? या मूळ प्रश्नावरही सरकारने काम सुरू केल्याचे संकेत त्यांनी दिले. भविष्यात शेतकऱ्याला कोणासमोर हात पसरण्याची वेळ येऊ नये, यासाठी उत्पादन वाढवणे आणि शेतीचा खर्च कमी करणे यावर दीर्घकालीन धोरण आखले जात आहे.

शेतकऱ्यांसोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी महिलांना विनातारण पाच लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्याची घोषणाही त्यांनी केली. 'लखपती दीदी' योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा सरकारचा मानस आहे. तसेच, 'लाडकी बहीण' योजना कोणत्याही परिस्थितीत बंद पडणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

# पुण्यात 'लाडकी बहीण' योजनेत १२०० पुरुषांनी लाटले पैसे

**पुणे, ता. ३ :** पुणे जिल्ह्यात लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी पूर्ण करूनही अनेक महिलांना अनुदानाचा लाभ मिळत नसल्याचा मुद्दा समोर आला आहे. या पार्श्व भूमीवर जिल्ह्यातील सुमारे २ लाख २५ हजार ३६० महिलांची थेट पडताळणी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. याचवेळी या योजनेत पुरुष लाभार्थीही अनुदान घेत असल्याची माहिती उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात एकूण १२०२ पुरुष लाभार्थी असल्याचे आढळले असून त्यामध्ये हवेली आणि पुणे तालुक्यातील ४८७ जणांचा समावेश आहे.

राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र, अनेक महिलांनी अर्ज सादर करून आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही त्यांच्या खात्यात रक्कम जमा




झालेली नाही. ई-केवायसी करताना तांत्रिक अडचणी, कागदपत्रांतील त्रुटी आणि माहिती अपडेट न झाल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगितले जाते.

काही लाभार्थी महिलांच्या तक्रारीनुसार चारचाकी वाहन असलेल्या कुटुंबांतील लाभार्थ्यांचे अनुदान सुरू राहिले, तर वाहन नसलेल्या, सरकारी नोकरी किंवा पेन्शन नसलेल्या महिलांचे अनुदान थांबवण्यात आले. या तक्रारींची दखल घेत महिला व बाल विकास विभागाने पुन्हा एकदा ई-केवायसी आणि पात्रतेची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.

पुणे जिल्ह्यात या योजनेचे सुमारे २० लाख लाभार्थी आहेत. तपासणीदरम्यान काही ठिकाणी पुरुषांच्या नावावर लाभ घेतला जात असल्याचे समोर आले. त्यामुळे हे लाभार्थी खरेच पात्र आहेत का, याची खातरजमा करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. ई-केवायसी झालेल्या लाभार्थ्यांपैकी कोणी पुरुष आहे का, तसेच चुकीच्या पद्धतीने लाभ घेतला जात आहे का, याची तपासणी केली जाणार आहे.

सरकारी नोकरदार किंवा पेन्शनधारक कुटुंबातील व्यक्ती असल्यास त्या कुटुंबातील लाभार्थी अपात्र ठरणार आहेत. मात्र, अशा कोणत्याही अटी लागू होत नसतील तर संबंधित महिला योजनेस पात्र मानली जाणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र महिलांना अनुदानाचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कात्रज दूध संघाला अजितदादांचे नाव देण्याचा ऐतिहासिक निर्णय

**पुणे, ता. ३ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनाला आज सहावा दिवस झाला असला, तरी महाराष्ट्र अद्यापही शोकातून सावरलेला नाही. राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात त्यांच्या आठवणी जपण्यासाठी विविध पातळ्यांवर निर्णय घेतले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर पुण्यात सहकार क्षेत्रात अजित पवार यांच्या स्मृती जपणारा पहिला ठोस निर्णय घेण्यात आला आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर शनिवारी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सूत्रे हाती घेत उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शपथविधीनंतर त्यांनी पहिलाच दौरा साताऱ्याला करत अजित पवार यांच्या अंगरक्षकाच्या घरी जाऊन सांत्वन केले. त्यानंतर कराड येथील यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीस्थळ असलेल्या प्रितीसंगमावर जाऊन त्यांनी अभिवादन केले. या दौऱ्यामुळे त्या अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीच्या पावलावर पाऊल टाकत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या आठवणींनी ज्येष्ठ नेते शरद पवार भावूक झाल्याचे चित्र बारामतीत पाहायला मिळाले. मुंबईला रवाना होण्यापूर्वी त्यांनी विद्या प्रतिष्ठानच्या शैक्षणिक संकुलात जाऊन अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारस्थळी भेट दिली. या ठिकाणीच अजित पवार यांचे भव्य स्मारक उभारावे, अशी सूचना त्यांनी विद्याप्रतिष्ठानचे विश्वस्त किरण गुजर यांना दिली. त्यामुळे बारामतीतच अजित




पवार यांचे स्मारक उभारले जाणार, हे जवळपास निश्चित झाले आहे.

सहकार क्षेत्रात मात्र सर्वात महत्त्वाचा निर्णय पुण्यात घेण्यात आला. कात्रज दूध संघाने आपल्या नावात बदल करण्याचा ठराव मंजूर केला आहे. आता या संघाचे नाव अजितदादा पवार पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ, कात्रज असे ठेवण्याचा निर्णय संचालक मंडळाच्या शनिवारी झालेल्या बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला.

संघाच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय केवळ नाव बदलण्यापुरता मर्यादित नाही. पुणे जिल्ह्यातील सहकार चळवळीला दिशा देणे, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी संस्थात्मक बळकटीकरण करणे आणि दीर्घकालीन विकासाचा दृष्टिकोन ठेवणे, हे अजित पवार यांच्या नेतृत्वाचे ठळक वैशिष्ट्य होते. संघाच्या पायाभूत सुविधांसाठी जमीन उपलब्ध करून देण्यापासून ते धोरणात्मक मार्गदर्शनापर्यंत त्यांचे योगदान निर्णायक ठरले.

या नामकरणाच्या माध्यम ातून सहकार क्षेत्रासाठी अजित पवार यांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करण्यात आला असून, पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी स्मृती जपण्याचा हा प्रयत्न असल्याचे संघाने स्पष्ट केले आहे. पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून लवकरच या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे.

# पुण्यातील ‘हॉटेल कॉनरॉड’ संचालकाची सायबर फसवणूक; २० लाखांचा गंडा

**पुणे, ता. ३ :** पुण्यातील बंडगार्डन परिसरात असलेल्या हॉटेल कॉनरॉड मध्ये अत्यंत शिताफीने रचलेल्या सायबर फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हॉटेलचे मालक असल्याचे भासवत व्हॉट्सॲपवर संदेश पाठवून सायबर चोरट्यांनी थेट फायनान्स संचालकांकडून २० लाख ९० हजार रुपयांची रक्कम उकळली. वरिष्ठ पदावर कार्यरत असलेला अधिकारीही या जाळ्यात अडकल्याने, कॉर्पोरेट स्तरावर सायबर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



याप्रकरणी हॉटेल कॉनरॉडचे डायरेक्टर ऑफ फायनान्स बीपलब चक्रबोरती यांनी कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली आहे. ही घटना ८ जानेवारी २०२६ रोजी घडली. त्या दिवशी सकाळी सुमारे ११ वाजता काम करत असताना बीपलब चक्रबोरती यांच्या व्हॉट्सॲपवर एका अनोळखी क्रमांकावरून संदेश आला. हा संदेश हॉटेल कॉनरॉड आणि पाम ग्रुप बीच हॉटेल्सचे मालक संदीप रहेजा यांच्याकडून आल्याचे भासवण्यात आले होते. हा माझा वैयक्तिक नंबर आहे, कुणाला शेअर करू नका, असा विश्वासार्ह मजकूर असल्याने त्यांनी तो नंबर सेव्ह केला.

यानंतर आयटीसीकडून पैसे आले आहेत का, अशी चौकशी करण्यात आली. काही वेळाने आरोपींनी बँक खात्याचे तपशील पाठवत तातडीने आरटीजीएसद्वारे २० लाख ९० हजार ६०१ रुपये अमर सिंग नावाच्या खात्यात पाठवण्यास सांगितले. आपण थेट मालकाशीच संवाद साधत आहोत, असा विश्वास असल्याने आणि कॉल न करण्याच्या सूचनेमुळे शंका न घेता बीपलब चक्रबोरती यांनी रक्कम ट्रान्सफर केली.

रक्कम पाठवल्यानंतर संपर्क न झाल्याने संशय बळावला. मुंबईतील कंपनी कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर मालकांनी कोणतीही सूचना दिली नसल्याचे स्पष्ट झाले आणि फसवणूक झाल्याचे उघड झाले. तातडीने बँक आणि १९३० हेल्पलाईनवर तक्रार देण्यात आली. मात्र तोपर्यंत रक्कम दुसऱ्या बँकेत वर्ग झाली होती.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत नवी ‘महायुती’

## कट्टर संघर्ष विसरून महेश लांडगे अन् अजितदादांचा गट आता एकाच सत्तेच्या खुर्चीवर?

**पिंपरी चिंचवड, ता. ३ :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सत्तासमीकरणांबाबत मोठे संकेत मिळाले असून, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र सत्तेत बसण्याची शक्यता उघडपणे पुढे आली आहे. भाजपचे गटनेते प्रशांत शितोळे यांनी राष्ट्रवादीला सोबत घेण्याबाबत सकारात्मक भूमिका जाहीर केल्याने शहराच्या राजकारणात नवी दिशा स्पष्ट होत आहे. सध्याच्या घडामोडी पाहता, पिंपरी चिंचवडमध्ये भाजपसमोर प्रभावी विरोधक उरणार नाहीत, असे चित्र तयार झाले आहे.




महापौरपदासाठी भाजपकडून रवी लांडगे यांची उमेदवारी निश्चित करण्यात आली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे. मात्र उपमहापौरपदासाठी भाजपकडून चर्चेत असलेल्या शीतल शिंदे यांनी ऐनवेळी पद स्वीकारण्यास नकार दिल्याने भाजप नेत्यांना उमेदवार बदलण्याची वेळ आली. अखेर भाजपच्या ज्येष्ठ नगरसेविका शर्मिला बाबर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केला. या घडामोडींमुळे भाजपमध्येही अंतर्गत गणिते बदलताना दिसली.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुरुवातीला दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून महापौरपदाची निवडणूक लढवली जाणार नसल्याचे सांगण्यात आले होते. मात्र त्यानंतर अचानक राष्ट्रवादीकडून वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी अर्ज दाखल केल्याने राजकीय चर्चांना उधाण आले. यामुळे भाजप आणि राष्ट्रवादी एकत्र सत्तेत सहभागी होणार का, हा प्रश्न ऐरणीवर आला.

याबाबत विचारले असता प्रशांत शितोळे यांनी स्पष्टपणे सांगितले की, शहराचा एकत्रित आणि वेगवान विकास साधण्यासाठी राष्ट्रवादीला सोबत घेण्यास भाजप तयार आहे. तसेच अजित पवार यांच्यावरील धार्मिक विधी अद्याप पूर्ण न झाल्याने, शिष्टाचार पाळत कोणताही जल्लोष किंवा सत्तारोहणाचा आनंद साजरा केला जाणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. महत्त्वाचे म्हणजे, मागील महापालिका निवडणुकीत भाजप आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात तीव्र संघर्ष पाहायला मिळाला होता. अजित पवार आणि भाजप आमदार महेश लांडगे यांच्यातील वाकयुद्ध राज्यभर चर्चेचा विषय ठरले होते. अखेर त्या संघर्षात महेश लांडगे यांची सरशी झाली.

आता अजित पवार यांच्या निधनानंतर पुन्हा संघर्ष नको, स्थैर्य आणि विकासाला प्राधान्य द्यावे, या भूमिकेतून दोन्ही पक्ष महापालिकेत एकत्र सत्तेत बसण्याच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# घटस्फोटीत पतीचा पत्नीवर जीवघेणा हल्ला; दोन आयफोनची चोरी

**छत्रपती संभाजीनगर, ता. ३ :** छत्रपती संभाजीनगर शहरातील चिकलठाणा परिसरात असलेल्या एका नामांकित फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये पतीपत्नीच्या नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना घडली आहे. खासगी कामानिमित्त हॉटेलमध्ये थांबलेल्या तरुणीवर तिच्या घटस्फोटीत पतीने जबरदस्तीने खोलीत प्रवेश करून मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मनाल सैय्यद मुक्तार अली (रा. प्रिया कॉलनी, पडेगाव) यांनी पोलीसांत तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, शनिवारी दुपारी सुमारे २ वाजता त्या खासगी कारणासाठी चिकलठाणा येथील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये दाखल झाल्या होत्या. सायंकाळी सुमारे ४.३० वाजता हॉटेलच्या रिसेप्शनवरून त्यांच्या रूमवर फोन आला. तुम्हाला भेटण्यासाठी एक व्यक्ती आली आहे, त्याला रूमवर पाठवू का? अशी विचारणा करण्यात आली. ओळखीचा व्यक्ती असावा, या समजुतीने फिर्यादीने परवानगी दिली.



काही वेळाने दरवाजा वाजल्यावर समोर शेख इर्शाद हा व्यक्ती असल्याचे लक्षात आले. तो आपला घटस्फोटीत पती असल्याचे फिर्यादीने तक्रारीत नमूद केले आहे. त्यानंतर आरोपीने हाऊसकिपरच्या मदतीने सुमारे ४.४५ वाजता जबरदस्तीने रूमचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला. यावेळी त्याने शिवीगाळ करत हाताने मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

या गोंधळात फिर्यादी महिला रूमच्या बाहेर पळून आली. त्यानंतर रूममध्ये ठेवलेले दोन मोबाईल फोन गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. आरोपीनेच हे मोबाईल चोरून नेल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. चोरीस गेलेल्या मोबाईलमध्ये एक आयफोन १७ प्रो मॅक्स (अंदाजे किंमत १ लाख रुपये) आणि एक आयफोन १६ प्रो मॅक्स (अंदाजे ७० हजार रुपये) असा एकूण मुद्देमाल असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात मारहाण, धमकी व चोरीचे कलम लावून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. फाईव्ह स्टार हॉटेलसारख्या सुरक्षित मानल्या जाणाऱ्या ठिकाणी घडलेल्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून ४ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई, ता. ३ :** महाराष्ट्राच्या प्रशासकीय यंत्रणेत पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर खांदेपालट सुरू झाली असून, सोमवारी राज्यातील ४ ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार हे निर्णय घेण्यात आले असून, गेल्या वर्षभरापासून सुरू असलेली बदल्यांची मालिका या आठवड्यातही कायम राहिली आहे.




देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर प्रशासनात नियमितपणे बदल्या केल्या जात आहेत. साधारणपणे प्रत्येक १० ते १५ दिवसांनी ८ ते १० सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या होत असल्याने, प्रशासनात स्थिरतेपेक्षा कार्यक्षमतेला अधिक प्राधान्य दिले जात असल्याचे संकेत मिळतात. या पार्श्वभूमीवर सोमवारी जाहीर झालेल्या बदल्यांकडे महत्त्वाच्या प्रशासकीय निर्णयांपैकी एक म्हणून पाहिले जात आहे.

या आदेशानुसार श्रीधर दुबे जे आतापर्यंत महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक होते, त्यांची आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सत्यजित बडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांची अपंग व्यक्तींसाठी आयुक्त, पुणे म्हणून बदली करण्यात आली आहे. डॉ. सुनील भोकरे यांची महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई येथील प्रकल्प संचालक (शहरी आरोग्य) पदावरून आयुक्त, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर राहुल कुलकर्णी, गृह विभागातील सहसचिव, मंत्रालय, मुंबई यांची महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याआधीच शुक्रवारी सायंकाळी आणखी दोन वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले होते. मनिषा म्हैसकर पाटणकर यांची बदली अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर करण्यात आली आहे. डॉ. आय. एस. चहल यांच्या सेवानिवृत्तीनंतर हे पद रिक्त झाले होते. त्यांच्या जागी मिलिंद म्हैसकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सततच्या बदल्यांमुळे प्रशासनात नवे चेहरे, नवी जबाबदारी आणि नव्या कार्यपद्धती आकाराला येत असल्याचे चित्र आहे. या बदल्यांचा थेट परिणाम राज्यातील अन्न सुरक्षा, आरोग्य, सामाजिक न्याय आणि सहकार क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेवर होणार असून, येत्या काळात त्याचे परिणाम स्पष्टपणे दिसून येणार आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## आहारात मासे समाविष्ट करण्याचे आरोग्यवर्धक फायदे, वाचा

मासे हे आपल्या आरोग्यासाठी फार गुणवर्धक मानले जातात. आपल्या धावत्या जीवनशैलीत नानाविध आजारांना सामोरं जावं लागत आहे. यातलीच एकआजार म्हणजे ब्रेन स्ट्रोक. अलीकडे ब्रेन स्ट्रोकमुळे होणारे मृत्यू फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहेत. हे सर्व होण्यामागे आपला आहार हा कारणीभूत आहे. आहारातील योग्य बदल आणि प्रत्येक गोष्टींचं योग्य नियोजन केल्यास आपल्याला निरोगी राहण्यास नक्कीच मदत होईल.

आपल्या आहारामध्ये मासे समाविष्ट करणे हे खूप लाभदायक आहे. आहारामध्ये मासे खाल्ल्यास ब्रेन स्ट्रोकचा धोका मोठ्या प्रमाणावर कमी होतो. माशांमध्ये असलेल्या ओमेगा फॅटी ऍसिड हे मेंदूच्या आरोग्यासाठी खूपच हितावह असल्याचे आता सिद्ध झालेले आहे. आठवड्यातून दोनदा मासे खाल्ल्यास पक्षाघाताचा धोकाही खूप मोठ्या प्रमाणावर कमी होतो.

मासे नियमित सेवन केल्यामुळे मेंदूशी संबंधित आजार (सेरेब्रोव्हस्कुलर डिसीज, किंवा व्हॅस्कुलर ब्रेन डिसीज) दूर राहतात.

मासे खाल्ल्याने हृदयरोग, स्ट्रोक आणि रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका कमी होतो. तसेच मासे रक्तदाब आणि ट्रायग्लिसराइडची पातळीही कमी करू शकतात. मासे अल्झायमर रोगासह डिमेंशियाचा धोका कमी करण्यास मदत करतात.

स्तनदा मातांसाठी बाळांच्या निरोगी दृष्टीसाठी मासे खाणे हे खूपच हितावह आहे. मुख्य म्हणजे सुरमई, बांगडा यासारखे मासे हे ओमेगा-फॅटी ॲसिडसह समृद्ध असतात. त्यामुळे आपल्या त्वचेसाठीही उत्तम मॉइश्चरायझर म्हणून काम करतात.

मासे दमा, मधुमेह आणि दाहक परिस्थितींमध्ये मदत करू शकतात

मासे जखमा बरे करण्यास, न्यूरोप्रोटेक्शन आणि हेपॅटोप्रोटेक्शन मध्ये मदत करू शकतात.

मासे खाण्यामुळे आपल्याला चांगली झोप लागण्यासही मदत होते.

एका संशोधनात्मक अभ्यासात असे आढळून आले की जे लोक जास्त मासे खातात त्यांना स्ट्रोकची लक्षणे कमी होती, तर दुसऱ्या अभ्यासात असे आढळून आले की माशांच्या सेवनाने रक्तवहिन्यासंबंधी मेंदूचे नुकसान होण्याची जोखीम लक्षणीयरीत्या कमी होती. तुम्ही आठवड्यातून दोन दिवसही मासे खाल्ले तर तुम्ही ब्रेन स्ट्रोकचा धोका टाळू शकता.

# रवी लांडगे पिंपरी चिंचवडचे नवे महापौर; उपमहापौर पदासाठी रंगणार निवडणूक




**पिंपरी चिंचवड, ता. ३ :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या महापौर पदासाठी बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक रवी लांडगे यांनी सोमवारी (दि. २) अर्ज दाखल केला. तर त्यांच्यासोबत उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबर यांनी अर्ज भरला आहे. महापौर पदासाठी फक्त लांडगे यांचा अर्ज आल्याने त्यांचा महापौर होण्याचा मार्ग मोकळा झाला असून ते बिनविरोध महापौर झाले आहेत.

याबाबतची घोषणा शुक्रवारी (ता. ०६) महापालिका सभेमध्ये करण्यात येईल. तर उपमहापौर पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी अर्ज दाखल केल्याने या पदासाठी सभागृहात निवडणूक घेण्यात येईल.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजपाचे सर्वाधिक ८५ नगरसेवक निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ३६ इतकेसंख्याबळ आहे.

त्यानुसार भाजपच महापालिकेत सत्ता स्थापन करणार आहे. महापौर निवडीसाठी नगरसचिव कार्यालया मध्ये अर्ज स्वीकारण्यात आले. यामध्ये भाजपकडून महापौर पदासाठी रवी लांडगे यांचा तर उपम हापौर पदासाठी शर्मिला बाबर यांचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. यावेळी आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, उमा खापरे, भापजचे नवनिर्वाचित पक्षनेते प्रशांत शितोळे आदी उपस्थित होते.

अर्ज भरण्यासाठी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र. या दोन तासांमध्ये महापालिकेमध्ये मोठ्या नाट्यमय घडामोडी घडल्या. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी महापौर पदासाठी रवी लांडगे तर उपमहापौर पदासाठी शितल उर्फ विजय शिंदे यांचे नाव जाहीर केले होते. मात्र, शितल शिंदे यांनी महापौर पद स्वीकारण्यास नकार दिला.

दुपारी तीन वाजता ते महापालिका भवनमध्ये आले होते. मात्र, उपमहापौरपदासाठी नाव जाहीर होताच त्यांनी नाराजी व्यक्त केली. तर रागातच ते महापालिका भवनमधून बाहेर पडले.दरम्यान, भाजपच्या शितल शिंदे यांनी उपमहापौर पदासाठी नकार दिल्याचे कळताच राष्ट्रवादी काँग्रेसने वैशाली काळभोर यांचा उमपहापौर पदासाठी अर्ज दाखल केला.

काळभोर या प्रभाग क्रमांक १५ मधून निवडून आल्या असून त्या ज्येष्ठ आहेत. त्यांनी अर्ज दाखल केल्यानंतर भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने देखील सूत्रे फिरवली. दरम्यानच्या काळात शितल शिंदे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, शिंदे यांनी महापौर पद किंवा स्थायी समितीचे सभापती पदच पाहिजे असल्याचा हट्ट धरला.

त्यानंतर दोन वेळा नगरसेविका झालेल्या शर्मिला बाबर यांना संधी देण्याचा निर्णय भाजपच्या वतीने घेण्यात आला. त्यानुसार, उपमहापौर पदासाठी भाजपकडून शर्मिला बाबर यांचा अर्ज भरण्यात आला.

## सोमटणे फाट्यावर भीषण अपघात

**मावळ, ता. ३ :** सोमटणे फाटा येथे भरधाव कंटेनरने दिलेल्या धडक्त एका ५३ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी (ता. १ फेब्रुवारी) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास जुना पुणे- मुंबई हायवेवर मुंबईकडून पुण्याकडे जाणाऱ्या लेनवर घडली.बाबासाहेब रामभाऊ जाधव (वय-५३) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणात रोहित हनुमंत बजगुडे (वय-२९, रा. शोभा नगर, तळेगाव दाभाडे) यांनी रविवारी (ता. १) तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी कंटेनर चालक लाल शेखर यादव (रा. ईसापूर, आजमगड, उत्तर प्रदेश) याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबासाहेब जाधव हे आपल्या मोपेडवरून बाजारात जात होते. यावेळी आरोपीने आपल्या ताब्यातील कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या अपघातात जाधव हे वाहनाखाली आल्याने त्यांच्या पोटावरून चाक गेले आणि गंभीर दुखापत झाली.

# भारतावर पाकिस्तान, बांगलादेश अन् चीनपेक्षाही कमी टॅरिफ



**नवी दिल्ली, ता. ३ :** भारतासाठी आनंदाची बातमी आली समोर आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेकडून भारतावर कर कपात करण्याची घोषणा केली. सोमवारी रात्री ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक लांबलचक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये कर कपात आणि भारत-अमेरिका व्यापार कराराची घोषणा करण्यात आली. त्यांनी सांगितले की भारतावरील परस्पर कर आता २५ टक्के वरून फक्त १८ टक्के पर्यंत कमी केला जाईल.

दरम्यान, अमेरिकेच्याराष्ट्राध्यक्षांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींना आपला सर्वात चांगला मित्र म्हटले. तसेच त्यांच्या मैत्रीला अनुसरून, महत्त्वपूर्ण कर कपातीची घोषणा केली. दरम्यान, ट्रम्प यांनी भारतासोबत खरी मैत्री निभावली. कारण भारतावर शेजारी पाकिस्तान, बांगलादेश आणि चीनपेक्षा कमी कर लादला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासोबत व्यापार कराराची घोषणा केली आहे. ज्यामुळे भारतीय वस्तूंवरील कर % वरून % पर्यंत कमी झाला आहे. या घोषणेमुळे जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही देशांमध्ये काही काळापासून सुरू असलेला व्यापार तणाव कमी होण्यास मदत होईल.

भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी असेही म्हटले आहे की, भारत रशियन तेल खरेदी करणे थांबवेल आणि अंतिम कर ५० टक्के ऐवजी १८ टक्के आहे. रॉयटर्सच्या एका वृत्तानुसार, अमेरिकेने रशियन तेल आयातीवरील दंडात्मक शुल्क मागे घेतले आहे आणि आता फक्त १८ टक्केचा सुधारित परस्पर शुल्क लागू होईल.

ट्रम्पने भारतासाठी या मोठ्या शुल्क कपातीच्या घोषणेमुळे, नवीन अमेरिकन शुल्क रचनेमुळे, भारताला आता या बाबतीत त्याच्या शेजारील अर्थव्यवस्थांपेक्षा जास्त फायदा झाला आहे. भारताकडे आता चीन आणि पाकिस्तानपेक्षा कमी शुल्क आहे, तर इंडोनेशिया, बांगलादेश आणि व्हिएतनाम हे देखील भारतापेक्षा जास्त शुल्क आकारणारे देश बनले आहेत. हे टॅरिफ आकडे असे दर्शवतात की भारतासाठी सुधारित टॅरिफ दर अमेरिकेच्या सर्वात महत्त्वाच्या मित्र आणि व्यापारी भागीदारांच्या यादीत जवळ आले आहेत.

## आनंद मनुक्काच्या नावाखाली अंमली पदार्थांची विक्री

### चौफुल्यात बंटा गोळ्या विकणाऱ्याला ठोकल्या बेड्या

**राहुलकुमार अवचट**

यवत, ता. ३ : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील चौफुला (ता. दौंड) परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, यवत पोलिसांनी मोठी कारवाई करत एका पानटपरी चालकाला अटक केली आहे. बोरीपार्धी गावच्या हद्दीत कारभारी मिसळ शेजारी असलेल्या पानटपरीतून गांजामिश्रित बंटा गोळ्या विकल्या जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

यवत पोलिसांना चौफुला येथील एका पानटपरीमध्ये गुंगीकारक व अंमली पदार्थांची साठवणूक करून खुलेआम विक्री केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्या अनुषंगाने १ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी शासकीय पंच, फॉरेन्सिक पथक, वजनकाटा धारक व छायाचित्रकार यांच्यासह संबंधित पानटपरीवर छापा टाकला.

छाप्यादरम्यान टपरी चालक रमेश रामबली कुसवाह याच्याकडील एका पिशवीत आनंद मनुक्का या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गांजामिश्रित बंटा गोळ्यांचे ८पाकीट आढळून आले. सदर अंमली पदार्थाचे एकूण वजन २ किलो १६९ग्रॅम इतकेअसल्याचे निष्पन्न झाले. फॉरेन्सिक पथकाने केलेल्या प्राथमिक तपासणीत या गोळ्यांमध्ये अंमली पदार्थ असल्याचीखात्री झाली. पोलिसांनी सदर सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू असून या अंमली पदार्थांचा पुरवठा कुठून होत होता व आणखी कोण सहभागी आहेत का, याचा शोध घेतला जात आहे.

# जिल्हा परिषद – पंचायत समिती मतदार यादी वर्किंग कॉपीच्या कामास वेग

## अंतिम मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण

**पुणे, ता. ३ :** हवेली जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गट व गणांच्या मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून अंतिम मतदार यादी तयार करण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. हवेली येथील मतदार यादी वर्किंग कॉपी कक्षामध्ये अधिकारी व कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहून ही प्रक्रिया पार पाडण्यात आली. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रशासनाकडून काटेकोर नियोजन व विशेष दक्षता घेण्यात आली आहे.

सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी समन्वय साधून अंतिम मतदार यादीची छपाई प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे उमेदवार व प्रतिनिधींना अंतिम मतदार यादी वेळेत उपलब्ध करून देण्यावर प्रशासनाचा विशेष भर राहिला असून, त्यामुळे निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता व विश्वासार्हता अधिक बळकट होणार आहे.

मतदार यादीची वर्किंग व मार्क कॉपी तयार करताना आवश्यक माहितीचे सखोल संकलन व पडताळणी करण्यात आली. नोंदणीकृत मतदारांची नावे, पत्ते तसेच इतर तपशीलांची अचूकता तपासण्यात आली असून मृत, स्थलांतरित तसेच दुहेरी नोंदी असलेल्या मतदारांची छाननी करून यादी त्रुटीमुक्त करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाने वेळोवेळी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करत प्रत्येक टप्प्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात आली.



निवडणूक प्रक्रियेत कोणताही गोंधळ अथवा त्रुटी निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने प्रत्येक बाबीची बारकाईने तपासणी केली आहे. मतदारांना योग्य व वेळेवर सेवा मिळावी तसेच निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी, हा प्रशासनाचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार अर्चना निकम व तृप्ती कोलते तसेच नोडल अधिकारी रोहन भोसले, प्रा. सचिन शेळके आणि अविनाश तोरणे यांनी माहिती दिली की, संपूर्ण मतदार यादी प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पारदर्शक व सुव्यवस्थित पद्धतीने राबविण्यात आली असून अंतिम मतदार यादी लवकरच सर्व संबंधितांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# विमान अचानक पलटी कसे झाले, काहीतरी गडबड आहे; छगन भुजबळांनी व्यक्त केली शंका



**नाशिक, ता. ३ :** अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. राष्ट्रवादीचे अनेक नेते अजूनही या धक्क्यातून स्वतःला सावरून शकलेले नाहीत. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्यातील राजकीय चित्र बदलले आहे.

या घटनेची चौकशी डीसीजीएकडून सुरु असली तरी अपघाताविषयी काही महत्वाचे प्रश्न नेत्यांकडून उपस्थित केले जात आहे. आता राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ यांनी विमान अपघातविषयी शंका उपस्थित करत, विमान अचानक पलटी कसे झाले, काहीतरी गडबड आहे, असे मोठं विधान करत शंका उपस्थित केली आहे. नाशिक येथे शोकसभेत भुजबळांनी उपस्थित केलेल्या शंकेमुळे विमान अपघाताविषयी शंकांचे गारूड वाढताना दिसत आहे.

देशात अनेक विमान अपघात झाले. परंतु महाराष्ट्रात अशाप्रकारचा भयानक अपघात पहिल्यांदा झाला. मी घटनास्थळी प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा हे विमान इथं आले कसं काय? हे कळेना. टेबल टॉप होता आणि खाली ५० -६० फुट खाली पडले होते, असे छगन भुजबळांनी सांगितले.

त्यानंतर जेव्हा मी पार्थला भेटलो त्याच्याकडे एक सीसीटीव्ही फुटेज होते. त्यात ते विमान एकदा घिरटी घालून गेल्यानंतर दुसऱ्यावेळी सरळ असणारे विमान अचानक पलटी मारल्यासारखे दिसते. त्यानंतर काही क्षणात होत्याचे नव्हते होते, असे देखील भुजबळांनी सांगितले.

या घटनेबाबत सांगताना भुजबळ म्हणाले, चौकशी होईल, मी त्यातला तज्ञ नाही परंतु मी अनेकांशी बोलतोय. त्यात कुठेतरी काही गडबड झालीये, इंजिनमध्ये किंवा रडारमध्ये. आणखी काही असू शकते. चौकशी होईल, त्याची माहितीही येईल. पण जी सोन्यासारखी माणसे गेली ती कशी काय परत येतील असे म्हणत छगन भुजबळांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# स्वामी चिंचोली येथे सामाईक पाईप–लाईनच्या वादातून शेतकऱ्याला मारहाण

## दोघांविरुद्ध दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




**दौंड, ता. ३ :** रानातील सामाईक पाईपलाईन वापरायची नाही असे म्हणून शेजारील शेतकऱ्याला शिवीगाळ दमदाटी करून लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. सोमवारी (ता. २६) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास स्वामी चिंचोली (ता. दौंड) येथील जमीन गट नं ७२९ मधील शेतात घडली आहे. याप्रकरणी दोघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिलीप शामराव देसाई व नाना रामदास सस्ते (दोघेही रा. स्वामीचिंचोली, ता. दौंड, जि. पुणे) असे मारहाण करणाऱ्या दोघांची नावे आहेत. तर देवीदास नामदेव नहाणे (वय ५५, व्यवसाय शेती, रा. स्वामीचिंचोली, ता. दौंड, जि. पुणे) असे मारहाण झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी नहाणे यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवीदास नामदेव नहाणे हे सोमवारी (ता. २६) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास स्वामी चिंचोली येथील त्यांच्या गट क्रमांक ७२९ मधील ज्वारी पिकाची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी शेताजवळील गाडरस्त्यावर दोघांनी त्यांना अडवले.

यावेळी आरोपी दिलीप देसाई याने सामाईक पाईपलाईन वापरायची नाही असे म्हणत शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर आरोपी नाना सस्ते याने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या अंगठ्याजवळील बोट मुरगळून गंभीर दुखापत करत फॅक्चर केले. दोन्ही आरोपींनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

दरम्यान, या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पानसरे करत आहेत.


# अजित पवार हे परत शरद पवारांकडे आले असते, तर तो ऑपरेशन लोटसचा पराभव ठरला असता

## खासदार संजय राऊत यांचा दावा

**मुंबई, ता. ३ :** अजित पवारांचा पक्ष आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. त्या पक्षाचा चेहरा मराठमोळा आणि महाराष्ट्राचा होता. आता त्या पक्षावर गिधाडे तुटून पडतील आणि लचके तोडतील, अशी टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी केला. तसेच अजित पवार हे भाजप सोडून परत शरद पवारांकडे आले असते, तर तो ऑपरेशन लोटसचा सगळ्यात मोठा पराभव ठरला असता असेही संजय राऊत म्हणाले.

दिल्लीत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, अजित पवार भारतीय जनता पक्ष सोडून शरद पवारांकडे परत आले असते, तर तो ऑपरेशन लोटसचा सर्वांत मोठा पराभव ठरला असता. त्यामुळे अजित पवारांचा संशयास्पद विमान अपघात हा देखील ऑपरेशन लोटसचा भाग आहे का, असा प्रश्न लोक विचारत आहेत, असे राऊत म्हणाले. देशात इतक्या निर्घृण पद्धतीने राज्यकारभार सुरू आहे की कोणालाही आपल्या जीवाची शाश्वती नाही. जो भाजपच्या विरोधात जाईल, तो एकतर तुरुंगात जातो किंवा जीव गमावतो, असे वातावरण देशात निर्माण झाले आहे, असा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी मनोज नरवणे यांच्या पुस्तकाचा संदर्भ देत जे सत्य मांडले, त्यानंतर नरवणे यांचीही सुरक्षा वाढवावी, अशी मागणी राऊत यांनी केली. भाजप किंवा यंत्रणा काय करतील, याचा भरवसा राहिलेला नाही, असे ते म्हणाले. अजित पवारांचा पक्ष आता पूर्वीसारखा राहिलेला नाही. त्या पक्षाचा चेहरा मराठमोळा आणि महाराष्ट्राचा होता. आता त्या पक्षावर गिधाडे तुटून पडतील आणि लचकेतोडतील, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.



नवाब मलिकांच्या मुद्द्यावर बोलताना भाजप व शिंदे गटावर त्यांनी जोरदार टीका केली. पूर्वी त्यांना न घेण्याची भूमिका घेतली, मग आता त्यांच्याच नगरसेवकांची चाटूगिरी का केली जाते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. खोट्या प्रकरणांत अडकवून तुरुंगात टाकले आणि मुसलमान म्हणून आरोप केले, कारण निवडणुकीत फायदा घ्यायचा होता, असेही त्यांनी म्हटले.

सरकारवर टीका करताना संजय राऊत म्हणाले की, हे सरकार कोणत्याही विचारांचे नाही. हे सरकार हिंदुत्ववादी नाही, राष्ट्रवादी नाही. सत्ता, पैसा आणि भ्रष्टाचार हाच या सरकारचा विचार आहे. सावरकर त्यांना फक्त राजकारणासाठी लागतात.

कायदा जर सर्वांसाठी समान असेल, तर मग मंत्र्यांची आणि राजकीय नेत्यांची मुले कशी वाचतात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तीन हजार कोटींची जमीन जर ३०० कोटींमध्ये मंत्र्यांच्या मुलाला मिळत असेल आणि त्याला वाचवले जात असेल, तर त्याला देवेंद्र फडणवीस जबाबदार असल्याचा आरोपही त्यांनी केला. भ्रष्टाचाराला पाठीशी घालणे आणि त्याला प्रतिष्ठा देणे हेच फडणवीस सरकारचे उद्दिष्ट असल्याचा दावा त्यांनी केला.